धुळे, नंदुरबार, अकोला, वाशिम व नागपूर या ५ जिल्हा परिषदा व त्याअंतर्गत ३६ पंचायत समित्यांच्या सार्वत्रिक निवडणूकांसाठी मतदार यादी तयार करण्याचा कार्यक्रम-नोव्हेंबर-डिसेंबर-२०१९

# राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

निवडणूक प्राथम्य

क्रमांक:-रानिआ/जिपपस-२०१९/प्र.क्र.११/का.७
नवीन प्रशासन भवन, मादाम कामा रोड,
हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई ४०० ०३२.
दिनांक :- ३०/१०/२०१९

प्रति,
जिल्हाधिकारी,
धुळे , नंदुरबार, अकोला, वाशिम व नागपूर

विषय :- धुळे, नंदुरबार, अकोला, वाशिम व नागपूर या ५ जिल्हा परिषदा व त्यातंर्गत ३६ पंचायत समित्यांच्या सार्वत्रिक निवडणूका मतदार यादी तयार करण्याचा कार्यक्रम

संदर्भ :- १) राज्य निवडणूक आयोगाचे समक्रमांकाचे दि.३१/०५/२०१९ रोजी चे पत्र
२) मा. सर्वोच्च न्यायालय, दिल्ली यांचे विशेष अनुमती याचिका क्र.३३९०४-३३९१०/२०१७ मधील दि. १९/०७/२०१९ व दि.२८/०८/२०१९ रोजीचा निर्णय.
३) राज्य निवडणूक आयोगाची क्र.रानिआ/जिपपंस/२०१९/प्र.क्र२५/का.७, दिनांक १६ ऑक्टोबर,२०१९ रोजीची अधिसूचना
४) राज्य निवडणूक आयोगाचे दिनांक २४/१०/२०१९ चे पत्र.

महोदय,

राज्य निवडणूक आयोगाने संदर्भाधीन अ.क्र.४ येथील दि. २४/१०/२०१९ च्या पत्रान्वये आपल्या जिल्हयातील, जिल्हा परिषदा व त्याअंतर्गत पंचायत समित्यांच्या निवडणूका विहित कालावधीत घेण्याकरिता दि. ४/१०/२०१९ रोजी अस्तित्वात असलेल्या महाराष्ट्र विधानसभा मतदार याद्यांचे पारंपारिक पध्दतीने निवडणूक विभाग / निर्वाचक गणनिहाय विभाजन करण्याची कार्यवाही दि.३०/१०/२०१९ पर्यंत पुर्ण करण्याबाबत निदेश दिले आहेत. मा. सर्वोच्च न्यायालयाने विशेष अनुमती याचिका क्र. ३३९०४-३३९१०/२०१७ मध्ये दि.२८/०८/२०१९ रोजी दिलेल्या आदेशात राज्य सरकारने दोन महिन्यांच्या कालावधीत (म्हणजेच दि. २७/१०/२०१९ पर्यंत) आरक्षणासंदर्भात कार्यवाही पूर्ण केली नाही तर आयोगाने दि.१९/०७/२०१९ रोजीच्या आदेशात नमूद केल्याप्रमाणे धुळे, नंदुरबार,

अकोला, वाशिम व नागपूर जिल्हा परिषदा व त्याअंतर्गत पंचायत समित्यांच्या विद्यमान आरक्षण वाटपाच्याआधारे निवडणूक कार्यक्रम तात्काळ जाहीर करावा असे आदेशित केले आहे.

२. मा. सर्वोच्च न्यायालयाने आदेशित केल्याप्रमाणे राज्य शासनाकडून दि.२७/१०/२०१९ पर्यंत संबंधित जिल्हयाची नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गाची माहिती प्राप्त झाली नसल्याने आयोगाने निवडणूक कार्यक्रम तात्काळ जाहीर करणे आवश्यक झाले आहे. आयोगाचे दि.३१/०५/२०१९ रोजीच्या पत्रान्वये उक्त ५ जिल्हा परिषदा व त्याअंतर्गत ३६ पंचायत समित्यांच्या निवडणुकांसाठी तयार करण्यात आलेली मतदार यादी ही दि.१०/०४/२०१९ या अधिसूचित दिनांकावर आधारित आहे. मात्र भारत निवडणूक आयोगाने नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणूकांकरिता दि.०४/१०/२०१९ पर्यंत मतदार यादी अद्यावत केली आहे. त्यामुळे दि. १०/०४/२०१९ हा दिनांक ग्राहय धरल्यास महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीसाठी मतदान करणाऱ्या मतदारांपैकी दि.११/०४/२०१९ ते दि.०४/१०/२०१९ पर्यंत नोंदणी झालेले मतदार मतदानापासून वंचित राहू शकतात.

३. तरी उपरोक्त नमूद केल्याप्रमाणे दि.११/०४/२०१९ ते दि. ०४/१०/२०१९ पर्यंत समाविष्ट झालेल्या मतदारांना मतदानापासून वंचित राहू नये यासाठी जिल्हा परिषदेसाठी निवडणूक विभागनिहाय व पंचायत समित्यांसाठी निर्वाचक गणनिहाय मतदार याद्यांचे विभाजन करण्यासाठी पुढीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत:-

## आदेश

४. मतदार यादीच्या कार्यक्रमाची व्याप्ती - दिनांक ०१/०१/२०१९ हा अर्हता दिनांक धरुन भारत निवडणूक आयोगाकडून तयार केलेली दिनांक ०४ ऑक्टोबर, २०१९ रोजी अस्तित्वात असलेली महाराष्ट्र विधानसभेची मतदार यादी जिल्हा परिषदा व पंचायत समित्यांच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी वापरण्यात येईल.

राज्य निवडणूक आयोगाने राज्यातील सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सार्वत्रिक व पोट निवडणुकांकरिता दिनांक १६/१०/२०१९ च्या अधिनिसूचनेन्वये मतदार यादीचे संदर्भात दि.०४/१०/२०१९ हा दिनांक Cut off Date जाहीर केला असून त्यादिवशी (म्हणजेच दि. ०४/१०/२०१९ रोजी) अस्तित्वात असलेली महाराष्ट्र विधानसभेची मतदार यादी या सार्वत्रिक निवडणुकांसाठी वापरण्यात येईल.

५. वरील मतदार यादी ग्राहय धरुन जिल्हा परिषद व पंचायत समित्यांमधील अनुक्रमे परिशिष्ट-२ मध्ये नमूद जिल्हा परिषदा व पंचायत समित्यांच्या निवडणुकांसाठी मतदार यादीचा कार्यक्रम परिशिष्ट -१ प्रमाणे राहील.

| | | |
|---|---|---|
| (i) | प्रभागनिहाय प्रारुप मतदार यादी प्रसिध्द करणे | : दिनांक ०२/११/२०१९ |
| (ii) | प्रारुप मतदार यादीवर हरकती व सूचना दाखल करण्याचा कालावधी | : दिनांक ०२/११/२०१९ ते ०६/११/२०१९ |
| (iii) | प्रभागनिहाय मतदार याद्या अंतिम व अधिप्रमाणित करुन प्रसिध्द करणे | : दिनांक ०८/११/२०१९ |
| (iv) | मतदान केंद्रांची यादी व मतदान केंद्रनिहाय मतदार यादी प्रसिध्द करणे | : दिनांक ११/११/२०१९ |

६. **प्रभाग निहाय प्रारुप मतदार यादी तयार करणे :-**

६.१ जिल्हाधिकारी यांनी विधानसभेच्या मतदार याद्यांचे पारंपारिक पध्दतीने (ऑफलाईन) प्रभागनिहाय विभाजन करावे :-

६.२ प्रभागनिहाय मतदार यादी तयार करताना पुढील बाबींची खात्री करुन घ्यावी :-

अ) विधानसभा मतदार यादीत संबंधित निवडणूक विभाग / निर्वाचक गण क्षेत्रात समाविष्ट असलेल्या एकूण मतदारांची संख्या आणि संबंधित निवडणूक विभाग / निर्वाचक गणासाठी तयार करण्यात आलेल्या प्रभागनिहाय प्रारुप मतदार यादीतील मतदारांची एकूण संख्या समान आहे याची खातरजमा करण्यात यावी.)

ब) या मतदार यादीतील दुबार नावांबाबत आयोगाचे आदेश क्र.रानिआ/मनपा-२००७/ प्र.क्र.०६/का.०५, दिनांक २४/०४/२००७ अन्वये कार्यवाही करावी.

क) मयत अथवा स्थलांतरीत मतदारांच्या बाबतीत आयोगाचे आदेश क्र.रानिआ/मनपा-२०१०/प्र.क्र.४/का.५, दिनांक ११/१०/२०१० अन्वये कार्यवाही करावी.

ड) विधानसभेसाठी तयार करण्यात आलेल्या मतदार यादीमध्ये बदल करण्याचे जसे की, नवीन नावांचा समावेश करणे, नाव वगळणे, नावातील दुरुस्ती व पत्यांमधील दुरुस्ती करणे इत्यादींबाबतची कार्यवाही राज्य निवडणूक आयोगाकडून केली जात नाही. (आयोगाचे क्र.रानिआ-२०१५/प्र.क्र.३/प्रकल्प कक्ष, दिनांक १७/०४/२०१५ चे आदेश)

७. **प्रारुप प्रभागनिहाय मतदार यादी प्रसिध्द करणे :-**

प्रारुप प्रभागनिहाय मतदार यादीवर मतदार / नागरिकांकडून हरकती व सूचना मागविण्यासाठी, प्रारुप मतदार यादीला दिनांक ०२/११/२०१९ रोजी व्यापक प्रसिध्दी देण्यात यावी. (परिच्छेद ९ प्रमाणे)

८. प्राप्त झालेल्या हरकती व सूचना विचारात घेऊन प्रभागनिहाय मतदार यादी अंतिम करणे :-

८.१ दिनांक ०२/११/२०१९ ते दिनांक ०६/११/२०१९ पर्यंत प्राप्त झालेल्या हरकती व सूचनांवर नियमाप्रमाणे विचार करुन प्रभागनिहाय मतदार यादी अंतिम करण्यात यावी. प्राप्त होणाऱ्या हरकती व सूचनांनुसार फक्त खालीलप्रमाणे सुधारणा / दुरुस्ती करता येईल :-

(i) लेखनिकांच्या काही चुका

(ii) दुसऱ्या प्रभागातील मतदार चुकून अंतर्भूत झालेले

(iii) संबंधित प्रभागातील विधानसभा यादीत मतदारांची नावे असूनही, जिल्हा परिषद / पंचायत समितींच्या संबंधित प्रभागाच्या मतदार यादीमध्ये नावे वगळण्यात आली असल्यास अशा मतदारांची नावे मतदार यादीत समाविष्ट करणे.

८.२ विहित मुदतीत प्राप्त होणाऱ्या सर्व हरकती व सूचनांवर निर्णय घेऊन आवश्यक असल्यास योग्य त्या सुधारणा मतदार यादीत कराव्यात.

९. अंतिम मतदार याद्या अधिनियमातील तरतुदीनुसार अधिप्रमाणित करुन त्याबाबतची सूचना दिनांक ०८/११/२०१९ रोजी मुद्दा क्र. १० मध्ये नमूद केलेल्या पध्दतीने प्रसिध्द करण्यात यावी.

१०. प्रारुप व अंतिम प्रभागनिहाय मतदार यादीस जिल्हाधिकारी यांनी खालीलप्रमाणे व्यापक प्रसिध्दी द्यावी जसे-

(अ) जिल्हाधिकारी कार्यालय, जिल्हा परिषद कार्यालय, तहसिलदार कार्यालय, पंचायत समिती तसेच ग्रामपंचायत कार्यालयातील सूचना फलक

(ब) स्थानिक वृत्तपत्र

(क) स्थानिक केबल टि.व्ही.

(ड) जिल्हाधिकारी / जिल्हा परिषद कार्यालयातील संकेत स्थळ, इत्यादी

११. वरील सूचनांप्रमाणे आयोगाने अधिसूचित केलेल्या दिनांकास अस्तित्वात असलेल्या विधानसभेच्या मतदार यादीचे विभाजन विहित मुदतीत व बिनचूक करण्याची जबाबदारी संबंधित जिल्हाधिकारी व तहसिलदार यांची राहील.

१२. मतदार यादीचा कार्यक्रम सुरु झाल्यानंतर एखाद्या जिल्हा परिषद / पंचायत समितीच्या निवडणूकीबाबत न्यायालयाचे काही आदेश प्राप्त झाल्यास त्याबाबतचा अहवाल जिल्हाधिकारी यांनी आयोगास तात्काळ सादर करावा.

१३. मतदार यादीचा कार्यक्रम आयोगाच्या https://mahasec.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

मा. राज्य निवडणूक आयुक्त यांचे आदेशानुसार,

आपला,

(किरण कुरुंदकर)
सचिव
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

सोबत-परिशिष्ट-१ व २

प्रत :-

१. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई
२. प्रधान सचिव, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, बांधकाम भवन, मर्झबान पथ, फोर्ट, मुंबई
३. मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र राज्य, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई
४. विभागीय आयुक्त, नाशिक, अमरावती, नागपूर
५. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, धुळे, नंदुरबार, अकोला, वाशिम, नागपूर
६. महिती जनसंपर्क अधिकारी, राज्य निवडणूक आयोग, मुंबई
७. संगणकीकरण कक्ष, राज्य निवडणूक आयोग यांना आवश्यक त्या कार्यवाहीसाठी
८. राज्य निवडणूक आयोगातील सर्व कार्यासने
९. निवड नस्ती (कार्यासन-७), राज्य निवडणूक आयोग

राज्य निवडणूक आयोगाचे पत्र क्रमांक-रानिआ/जिपपंस-२०१९/प्र.क्र.११/का.७, दि. ३०/१०/२०१९

**परिशिष्ट-१**

**धुळे, नंदुरबार, अकोला, वाशिम व नागपूर या ५ जिल्हा परिषदा व त्याअंतर्गत ३६ पंचायत समित्यांमधील सार्वत्रिक निवडणुकीसाठी मतदार यादीचा कार्यक्रम**

| अ.क्र. | निवडणुकीचा टप्पा | टप्पा सुरु करण्याची /पुर्ण करण्याची तारीख |
|---|---|---|
| १ | मतदार यादी ग्राहय धरण्याचा दिनांक | दि. ०४/१०/२०१९ |
| २ | राज्य निवडणूक आयोगाने अधिसूचित केलेल्या तारखेस अस्तित्वात असलेल्या विधानसभेच्या मतदार यादीवरुन जिल्हा परिषद व पंचायत समित्यांमधील सार्वत्रिक निवडणूकीकरिता तयार केलेली मतदार यादी हरकती व सूचना मागविण्याकरिता प्रसिध्द करण्याचा दिनांक | दि. ०२/११/२०१९ |
| ३ | मतदार यादीसंदर्भात हरकती व सूचना दाखल करण्याचा अंतिम दिनांक | दि. ०६/११/२०१९ |
| ४ | निवडणूक विभाग व निर्वाचक गणाच्या छापील मतदार याद्या अधिनियमाच्या कलम १३ खाली अधिप्रमाणित करण्याची तारीख | दि. ०८/११/२०१९ |
| ५ | निवडणूक विभाग व निर्वाचक गणांच्या छापील मतदार याद्या माहितीसाठी ठेवण्यात आल्या आहेत, याबाबतची सूचना प्रसिध्द करण्याची तारीख | दि. ०८/११/२०१९ |
| ६ | मतदान केंद्रांची यादी व मतदान केंद्रनिहाय मतदार यादी प्रसिध्द करणे | दि. ११/११/२०१९ |

राज्य निवडणूक आयुक्त यांचे आदेशानुसार,

(किरण कुरुंदकर)
सचिव
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

## परिशिष्ट-२

| अ.क्र. | जिल्हा परिषद समितीचे नाव | पंचायत समितीचे नाव |
|---|---|---|
| १ | धुळे | १) शिरपूर<br>२) सिंदखेडा<br>३) साक्री<br>४) धुळे |
| २ | नंदुरबार | १) अक्कलकुवा<br>२) अक्राणी<br>३) तळोदा<br>४) शहादा<br>५) नंदुरबार<br>६) नवापूर |
| ३ | अकोला | १) तेल्हारा<br>२) अकोट<br>३) बाळापूर<br>४) अकोला<br>५) मुर्तीजापूर<br>६) पातूर<br>७) बार्शीटाकळी |
| ४ | वाशिम | १) मालेगांव<br>२) मंगळूरपीर<br>३) कारंजा<br>४) मानोरा<br>५) वाशिम<br>६) रिसोड |
| ५ | नागपूर | १) नरखेड<br>२) काटोल<br>३) कळमेश्वर<br>४) सावनेर<br>५) पारशिवनी<br>६) रामटेक<br>७) मौदा<br>८) कामटी<br>९) नागपूर (ग्रा)<br>१०) हिंगणा<br>११) उमरेड<br>१२) कुही<br>१३) भिवापूर |

RNI No. MAHBIL /2009/31748

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग एक—अ-मध्य उप-विभाग

वर्ष ५, अंक ४१] बुधवार, ऑक्टोबर १६, २०१९/आश्विन २४, शके १९४१ [पृष्ठ १, किंमत : रुपये २६.००

**असाधारण क्रमांक ५८**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या, ग्रामपंचायती, नगरपरिषदा, प्राथमिक शिक्षण आणि स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम यांखालील (भाग चार-ब मध्ये प्रसिद्ध करण्यात आलेले आदेश व अधिसूचना यांव्यतिरिक्त) आदेश व अधिसूचना.**

**राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र**

नवीन प्रशासन भवन, मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक,
मुंबई ४०० ०३२, दिनांक १६ ऑक्टोबर २०१९

**आदेश**

क्रमांक रानिआ/जिपपंस/२०१९/प्र.क्र.२५/का.७.—मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८ (१८८८ चा मुंबई ३) च्या कलम १९(१)(ब), महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९ (१९४९ चा मुंबई ५९) च्या कलम ७-अ, महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ (१९६५ चा महा. ४०) च्या कलम ११, महाराष्ट्र जिल्हा परिषदा आणि पंचायत समित्या अधिनियम, १९६१ (१९६२ चा महा. ५) च्या कलम १३ तसेच महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ (१९५९ चा मुंबई अधिनियम क्र. ३) चे कलम १०-अ व १२ चे पोट-कलम (१) अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून दिनांक ०४ ऑक्टोबर, २०१९ या दिवशी अस्तित्वात असलेली महाराष्ट्र विधानसभेची मतदार यादी, माहे डिसेंबर, २०१९ ते जानेवारी, २०२० मध्ये होणाऱ्या महानगरपालिका, जिल्हा परिषदा, पंचायत समित्या तसेच नगरपरिषदा/नगरपंचायतीच्या (अध्यक्ष पदासह) व ग्रामपंचायतींच्या (सरपंच पदासह) सार्वत्रिक/पोट निवडणुकांसाठी मतदार याद्या तयार करण्यासाठी वापरण्यात येईल, असे अधिसूचित करण्यात येत आहे.

मा. राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

**राजाराम झेंडे,**

सहसचिव,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र.



ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR DR. NAMDEO KONDAJI BHOSALE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004, EDITOR : DIRECTOR DR. NAMDEO KONDAJI BHOSALE.